**Online/E-filing Evidence** **किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४३/२०२४**

जायदाबी विरुध्द छन्नुबी

**निशाणी क्र. २५**

**गैरअर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १**

**<u>पडताळणी</u>**

शपथेवर निवेदन करतो की, नाव **शेख मन्सुर शेख मददु, वय ४८ वर्ष, धंदा– शेती, रा. म्हस्की, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद**, माझे सांगणेप्रमाणे मजकुर शपथपत्रात नमुद करण्यात आलेला असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे व मजकुर खरा व बरोबर आहे.

माझे म्हणणे/बचावाचे समर्थनार्थ नि.क्र. २१ सोबत एम.ए. क्र.१४/२०१४ यामध्ये नि.क्र. १ व त्यावरील पारित आदेशाची प्रमाणीत नक्कल दाखल केलेली आहे. सदर नक्कल प्रमाणीत असल्याने त्यास **<u>नि.क्र. २५/१</u>** देण्यात येते. सदर प्रकरणातील नि.क्र. ३० वरील तडजोडपत्र व त्यावरील आदेशाची प्रमाणीत नक्कल दाखल केली असून ती प्रमाणीत असल्याने त्यास **<u>नि.क्र. २५/२</u>** देण्यात येते. सदर एम.ए. नं. १४/१४ मधील नि.क्र. ३१ वरील पारित रेफरल आदेशाची प्रमाणीत नक्कल दाखल केली असून त्यास **<u>नि.क्र. २५/३</u>** देण्यात येते. सदर प्रकरणात मध्यस्थाकडुन दाखल झालेला मध्यस्थी अहवाल याची प्रमाणीत नक्कल दाखल केली असून ती नक्कल प्रमाणीत असून त्यास **<u>नि.क्र. २५/४</u>** लावण्यात येते.

**पडताळणी पूर्ण.**

**<u>अर्जदारातर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. ए. आर. साळवे यांच्या मार्फत</u>**

१. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार जायदाबी व इतरांनी वाटपासाठी माझ्या वडिलांचे विरुध्द दिवाणी दावा दाखल केलेला होता असे विधान माझे पुरावा शपथपत्रात आहे. सदर दावा क्र.२४५/२००६ यामध्ये अर्जदाराचा असलेला हिस्सा तिला वाटून ताब्यात देण्यात यावा असा आदेश पारित झालेला होता व आहे. हे म्हणणे खरे नाही की, आदेशाप्रमाणे वादीचा हिस्सा तिला दिला गेला नसल्यामुळे तिने हुकूम नाम्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून करीता अर्ज क्र. २१/२०१४ दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा क्र. २४५/२००६ यातील पारित निर्णय आम्हाला मान्य नसल्यामुळे करीता त्यावर आम्ही वरिष्ठ न्यायालयासमोर अपिल दाखल केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिल क्र. १६४/२०१२ यामध्ये आम्हा पक्षकारामध्ये तडजोड झालेली होती.

२.		हे म्हणणे खरे नाही की, सदर तडजोडीमध्ये अर्जदार जायदाबीचा सहभाग नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार जायदाबी तिला भरणपोषणासाठी खावटी मिळावी करीता तिने अर्ज क्र. २०२/२०१२ दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जात अर्जदार जायदाबी हिला खावटी मंजुर झालेली होती व एकरकमी रक्कम रु. ७०,०००/–(सत्तर हजार मात्र) तिला मंजुर झालेली होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारास मंजुर झालेली खावटी रक्कम मधील काही एक पैसा आम्ही तिला दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार व आम्हा मध्ये मध्यस्थामार्फत तडजोड होऊन म्हस्की गावातील गट क्र. ९४ मधील ९५ आर क्षेत्र तिला देण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, ठरल्याप्रमाणे अर्जदारास म्हस्की गावातील मिळकत आम्ही प्रत्यक्षात तिला दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराचे मिळकती संदर्भात महसुल अभिलेखात कोणताही दस्त अगर लेख झालेला नाही.

३.		हे म्हणणे खरे नाही की, मध्यस्थामार्फत ठरल्याप्रमाणे अर्जदारास खावटीची रक्कम अगर म्हस्की येथील शेत मिळकत देण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दरखास्त क्र. २१/२०१४ मध्ये ठरल्याप्रमाणे देखील अर्जदारास तिची मिळकत प्रत्यक्षात आम्ही दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी म्हस्की गावात ९५ आर क्षेत्राव्यतिरीक्त इतर मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खावटीच्या प्रकरणाचे संदर्भात जो सुलेनामा आमचेमध्ये झालेला होता, त्याप्रमाणे काही एक रक्कम आम्ही अर्जदारास दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर सुलेनामा प्रमाणे अर्जदारास जी जमीन मिळणे गरजेचे होते ती देखील आम्ही तिला दिलेली नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत.**

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2024.11.16 13:54:05 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

(आर. एम. कराडे)

**सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,**

वैजापूर.

दिनांक १६/११/२०२४